जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १९२ दिनांक - २२/०३/२०२५**

वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाघोली पोलीस स्टेशन हद्दीतील रेकार्डवरील गन्हेगारावर तडीपार कारवाई

वाघोली पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुन्हेगार **१) रोहन ऊर्फ मोन्या रामप्यारेगिरी वय. २० वर्षे रा. सुयोगनगर भावडी रोड ०४ नंबर, वाघोली ता.हवेली जि.पुणे २) विकास राजुजाधव वय. २० वर्षे, रा. केसनंद फाटा वाघोली ता.हवेली, जि.पुणे ३) आदित्य दिपक कांबळे वय. १८ वर्षे ३ महिने, रा. सिध्दी विनायक पार्क वाघोली ता.हवेली जि.पुणे ४) वैभव सुभाष पोळ वय. १८ वर्षे ३ महिने, रा. बी.जी.एस. फाटयाचे जवळ वाघोली ता.हवेली जि.पुणे** यांना पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४, पुणे शहर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे **पुणे जिल्ह्यातुन ०२ वर्षाकरीता** तडीपार केले आहे.

वाघोली पोलीस स्टेशन हद्दीतील पुणे अहमदनगर रोड, वाघोली, बकोरी फाटा वाघोली बाजारतळ तसेच आसपासच्या भागात दहशत माजवुन, गंभरी दुखापत करुन, तोडफोड करुन लोकांना कायम दहशती खाली ठेवुन त्यांना वारंवार त्रास देणा-या इसमामुळे सदर परिसरातील रहिवासी दडपणाखाली वावरत होते. लोकांच्या जीवितास धोका निर्माण करणा-या सराईत गुन्हेगारांच्या कृत्यामुळे लोकांच्या मनातुन कायद्याविषयी संभ्रम निर्माण झाला होता. सदर सराईत गुन्हेगारांवर कायद्याचा वचक बसावा या उद्देशाने सदर इसमावर मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती प्राजंली सोनवणे, वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री पंडीत रजितवाड यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक वैजिनाथ केदार, पोलीस अंमलदार सागर कडु, कमलेश शिंदे यांनी सदर सराईत टोळीप्रमुख व त्याचे साथीदार इसम यांचेवर दाखल गुन्ह्यांचा अभिलेखतपासुन सदर इसमांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे तडीपार करणेबाबत मा.पोलीस उप आयुक्त श्री. हिंमत जाधव यांना प्रस्ताव पाठविला असता, श्री. हिंमत जाधव यांनी सदर सराईत टोळीस **पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन दोन वर्षाकरीता तडीपार** केले आहे. यापुढे वाघोली पोलीस स्टेशन हद्दीत किंवा सोशल मिडीयाचा वापर करुन

दहशत निर्माण करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेऊन अशा प्रकारच्या कारवाईंची मोहीम सातत्याने राबविण्यात येणार आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त परि- ४ पुणे शहर श्री. हिंमत जाधव, मा. सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग, श्रीमती प्राजंली सोनवणे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पंडीत रेजितवाड यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप-निरीक्षक वैजिनाथ केदार, परि. पो.उप. दर्शन देवगडे, पोलीस अंमलदार प्रशांत कर्णवर, प्रदिप मोटे , सागर कडू, कमलेश शिंदे, महादेव कुंभार, साई रोकडे, पांडुरंग माने, विशाल गायकवाड, दिपक कोकरे, प्रतिम वाघ, गहिनीनाथ बोयणे, समीर बोरडे यांनी केली आहे.